## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/११/२०१६

**१) अज्ञात इसमाने धानाचा पुजना जाळुन नुकसान केले. :—**

दिनांक ३०+३१/१०/२०१६ रोजी ०७.०० वा. पर्यनत यातील फिर्यादी निरजंन रुपचंद जिभकाटे वय ३२ वर्ष, रा. डोंगरी बुज हा आपल्या शेताचे बांधीमध्ये धानाचा पुजणा रचुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात इसमाने धानाचा पुजना जाळुन ३०,०००/—रु. ची नुकसान केल्याने फिर्यादी निरजंन रुपचंद जिभकाटे वय ३२ वर्ष, रा. डोंगरीबुजरुक यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशि. भुते पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२)संगनमत करुन तंटामुक्ती अध्यक्षास अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ३१/१०/२०१६ रोजी १७.३० वा. दर. यातील फिर्यादी ही तंटामुक्त समितीची अध्यक्ष असुन ही काही बायांना सोबत घेवुन गावचे चौकात लोक तास पत्ते खेळत आहेत. म्हणुन गेली असता यातील आरोपीतांनी हिला कोणी माहीती दिली असे म्हणुन संगनमत करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली असे फिर्यादी सौ. पौर्णीमा भागवत चांदेवार रा. गोंडउमरी (तंटामुक्ती अध्यक्ष) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अश्लिल शबत शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १/११/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपल्या पानठेल्यात हजर असतांना त्याचे नातेवाईक प्राथमीक आरोग्य केन्द्र विरसी टोली येथे येवुन दवाखाना बंद असल्याने घरी परत जाण्यासाठी दवाखाण्यासमोर रोडवर उभी असता यातील आरोपीने नातेवाईक मुलीला अश्लिल शब्दात बोलल्याने फिर्यादीने आरोपीला हटकले असता आरोपीने ती तुझी नातेवाईक आहे का असे बोलुन भांडण करुन फिर्यादीस घान शब्दात शिविगाळ करुन थापड बुक्कीने मारहान करुन खाली पाडले व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादी रामेश्वर भिमराव गोटेफोडे वय ३६ वर्ष, रा. विरसीटोला यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) बचत गटातील पैश्याच्या वादावरुन शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०१/११/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी ही सुजाता महीला बचत गट गोंडउमरीची अध्यक्ष असुन यातील आरोपीची पत्नी ही सदस्य आहे. फिर्यादी ही महार जातीची असल्याने हे माहीती असुन सुध्दा ती आपल्या घरी सासु सोबत हजर असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे घरासमोर रोडवर जावुन आरोपीचे पत्नीचे नावाने असलेले गटातील पैसे मांगीतले असता फिर्यादीने आज पैसे देवु शकत नाही उद्याला मिळतील असे म्हटले असता पैसे आताच पाहीजे असे म्हणुन आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जीतीचा उल्लेख केल्याने आतच पैसे दे नाही तर तुम्हाला जिवाने ठार मारल्याशिवाय राहणार नाही. अशी धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र. का.सुधारना कायदा. सहकलम २९४,५०६ भादंवि .अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास एसडीपीओ. व्ही.एन.साळी साकोली हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

2/11/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.